# वाफारे घेण्याच्या चुकीच्या पद्धतीमुळे अपघात

## गरम पाणी अंगावर पडून लहान मुलांना भाजण्याच्या घटना

म. टा. प्रतिनिधी, पुणे

नाकावाटे शरीरात प्रवेश करणाऱ्या करोनाच्या विषाणूंचा नाश गरम पाण्याचे वाफारे घेतल्याने होत असल्याच्या तथाकथित माहितीमुळे वाफारे घेण्याच्या पद्धतीत वाढ झाली आहे. वाफारे घेण्याच्या चुकीच्या पद्धतीमुळे भाजण्याचे प्रकार घडले असून, त्यात सर्वाधिक लहान मुले भाजल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. शहरातील अनेक रुग्णालयांत लहान मुलेही प्लास्टिक सर्जनकडे उपचार घेत आहेत. त्यामुळे वाफारे घेताना काळजी घेण्याचा सल्ला वैद्यकतज्ज्ञांनी दिला आहे.

नाकावाटे शरीरात प्रवेश करणाऱ्या करोनाच्या विषाणूला रोखण्यासाठी गरम पाण्याचे वाफारे घेतल्यास विषाणू नष्ट होतात, असा समज सोशल मीडियाद्वारे पसरला आहे. अनेक करोनाबाधित रुग्णांसह करोनाचा संसर्ग होऊ नये, यासाठीही गरम पाण्याचे वाफारे घेण्याऱ्यांत वाढ झाल्याचे निरीक्षण वैद्यकीय तज्ज्ञांनी नोंदविले आहे. मात्र, यामुळे विषाणू नष्ट होतो, असे कोठेही वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झाले नसल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

'पूर्वी दूध सांडले किंवा उकळलेले पाणी पडल्याने भाजल्याच्या तक्रारी येत होत्या. वाफारे घेताना गरम पाणी अंगावर पडल्याने भाजल्याच्या तक्रारी घेऊन आता मात्र दररोज तीन ते चार रुग्ण येत आहेत. त्यात पॉझिटिव्ह अथवा निगेटिव्ह रुग्णांचा समावेश आहे. अंगावर भाजलेल्या ठिकाणी पाण्याचे फोड येतात. ती त्वचा खराब झाल्याने काढून टाकावी लागते. सुमारे १० ते १५ टक्के भाजल्यास बाह्यरुग्ण विभागात उपचार केले जातात. त्यापेक्षा जास्त प्रमाणात भाजल्यास रुग्णाला रुग्णालयात दाखल करून भूल द्यावी लागते. त्यानंतर ती खराब झालेली त्वचा काढून टाकली जाते. त्यानंतर 'कोलायजन ड्रेसिंग' केले जाते. पॉझिटिव्ह रुग्ण भाजल्यास उपचार करताना 'पीपीई किट' घालून ऑपरेशन थिएटरमध्ये उपचार करावे लागतात,' अशी माहिती प्लास्टिक सर्जन डॉ. स्वप्ना आठवले यांनी दिली.

> गेल्या तीन ते चार महिन्यांत गरम पाण्याचे वाफारे घेण्याचे प्रकार वाढले आहेत. पाणी अंगावर पडल्याने भाजण्याच्या प्रमाणातही वाढ झाली आहे. विशेषतः लहान मुलांना भाजण्याचे प्रकार अधिक आहेत. त्यामुळे मांडी, लघवीची जागा, पोट; तसेच पायावर जखमा होत आहेत. शहरात आजमितीला वाफारे घेण्याच्या प्रकाराने भाजण्याच्या सुमारे ५० ते ६० घटना घडल्या आहेत.
>
> – डॉ. पराग सहस्रबुद्धे, प्लास्टिक सर्जन



चित्र : अतुल बेलोकर

### 'सॅनिटायझर बर्न'च्याही घटना

गेल्या काही महिन्यांत करोनापासून बचावासाठी सॅनिटायझरचा वापरही सुरू आहे. मात्र, सॅनिटायझर लावून घरात किचनमध्ये जाण्याचे प्रकार समोर आले आहे. गॅसशेजारी सॅनिटायझर ठेवल्याने भडका उडून भाजण्याचे प्रकार घडले आहेत. त्यामुळे 'सॅनिटायझर बर्न'चे काही रुग्ण आढळले असून, त्यांच्यावर उपचार सुरू असल्याचे निरीक्षणही तज्ज्ञांनी नोंदवले.

### कोलायजन ड्रेसिंग म्हणजे काय...?

त्वचा मोठ्या प्रमाणात भाजल्यानंतर भाजलेली त्वचा काढून त्या ठिकाणी कृत्रिम त्वचा बसवली जाते. या पद्धतीच्या ड्रेसिंगला 'कोलायजन ड्रेसिंग' म्हटले जाते. ते कृत्रिम त्वचेसारखे असते. त्वचा लावल्यानंतर ८ ते १० दिवसांत निघून जाते. भूल देऊन भाजलेली जखम स्वच्छ केली जाते. त्या ठिकाणची त्वचा काढून कृत्रिम त्वचा लावतात. त्यामुळे जखम लवकर बरी होते. भाजलेल्या ठिकाणची त्वचा साधारण त्वचेपेक्षा जास्त जाड होऊन त्या ठिकाणी खाज सुटते. त्यासाठी नंतर 'लेसर ट्रीटमेंट'ही करावी लागते, अशी माहिती प्लास्टिक सर्जन डॉ. पराग सहस्रबुद्धे यांनी दिली.

### काय काळजी घ्याल?

- हातावर सॅनिटायझर घेऊन किचनमध्ये जाऊ नका.
- किचनमध्ये गॅसशेजारी सॅनिटायझर ठेवू नका.
- गरम पाण्याचे वाफारे घेताना काळजी घ्या.
- पातेल्याऐवजी वाफाऱ्याच्या विशिष्ट भांड्यातून गरम पाण्याच्या वाफा घ्या.
- मोठ्या व्यक्तींच्या उपस्थितीतच गरज पडल्यास लहान मुलांनी वाफारे घ्यावेत. जेणेकरून अंगावर गरम पाणी सांडणार नाही.
- वाफारे घेण्याचे भांडे जमिनीवर किंवा ओट्यावर ठेवावे.